R.No. MHHMAR/25/A3029
दैनिक
E-mail : dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
R.No. MHHMAR/25/A3029
लातूर
वर्ष : ६ वे, अंक नं. : २९
दि. ०८ जानेवारी २०२६, वार : गुरुवार
पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.
संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## प्रगतशील व विकसित लातूरसाठी भाजपला साथ द्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन : लातुरात भाजपाची ऐतिहासिक विजय संकल्प सभा

लातूर/प्रतिनिधी : लातूरचा विकास हे माझे ध्येय आहे. त्यासाठी लातूरकरांना भरभरून निधी आजवर दिला आहे. यापुढेही लातूरला कमी पडू दिले जाणार नाही. लातूरला विकसित शहर करण्यासाठीच मुंबईशी जोडले जात आहे. भविष्यात प्रगतीशिल व विकसित लातूरसाठी भाजपाला साथ द्या. लातूरच्या विकासाची जबाबदारी माझी असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कच्या मैदानावर भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी बुधवारी लातूर येथे विजय संकल्प सभा घेतली. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, निवडणुक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेश कराड, कृषीमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, संघटन सरचिटणीस संजय कौडगे, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील मुरुमकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, माजी खा. सुनिल गायकवाड, सुधाकर श्रृंगारे, माजी आ. बब्रुवान खंदाडे, शिवाजीराव पाटील कव्हेकर, गोविंद केंद्रे, त्रिंबकनाना भिसे, अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले सर्व उमेदवार उपस्थिती होती.

जनसमुदायाला संबोधित करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, समृध्दी महामार्गाने औद्योगिकरण वाढले. रस्ते हा विकासाचा महार्गातील महत्वाचा टप्पा आहे. मराठवाड्यातील जिल्ह्यांना मुंबईशी जोडले तर येथील विकास गतीने होणार आहे. त्यासाठीच लातूरला मुंबईशी व वाढवण बंदराला जोडण्यासाठी लातूर -कल्याण महामार्ग तयार होणार आहे. यामुळे अवघ्या पाच तासात मुंबईत पोहोचता येणार आहे. हा महामार्ग लातूरच्या प्रगतीचा महामार्ग ठरेल. लातूरकरांचा विकास हे माझे एकमेव ध्येय आहे. लातूरकरांनी भाजपाच्या पाठीशी उभे रहावे. लातूरचा संपूर्ण विकास करण्याची जबाबदारी मी घेतो. लातूरचा चेहरा- मोहरा बदलून दाखवू, असेही मुख्यमंत्री म्हणाले. लातूरसाठी आत्तापर्यंत विविध योजनांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला आहे. शहराला शुध्द पाण्यासाठी २५९ कोटी रुपयांची पाणीयोजना मंजूर केली. पुढील तीन-चार महिन्यात या योजनेच्या दुसजया टप्प्याला मंजुरी दिली जाणार आहे.

शहरात भुयारी गटार योजनेसाठी ३०५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. आधुनिक जिल्हा रुग्णालयासाठी निधी वर्ग केला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी पुतळा उभारणीसाठी १० कोटी रुपये दिले असून त्यासाठी आणखी निधी दिला जाणार आहे. नाट्यगृहासाठी १५ कोटी रुपये दिले असून आणखी २६ कोटी रुपये दिले जाणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

लातूर शहरातील वाहतूकीची समस्या सोडविण्यासाठी नवीन बाह्यवळण रस्त्याचा प्रस्ताव केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठवला आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे सौंदर्यीकरण करून तेथील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी काम केले जाणार आहे. स्व. विलासराव देशमुख मार्गाचा प्रस्ताव मंजूर केला आहे. आगामी चार महिन्यात लिंगायत समाजासाठी स्मशान भूमी (रूद्रभूमी)ची समस्या दूर केली जाईल. कोच फॅक्टरीच्या माध्यमातून १० हजार स्थानिक युवकांना लवकरच रोजगार उपलब्ध होणार आहे. झोपडपट्टीत राहणाजया नागरिकांना जमिनीच्या मालकीचे पट्टे दिले जाणार असल्याचे आश्वासनही मुख्यमंत्री यांनी दिले. मात्र यासाठी १५ जानेवारीला तुम्ही कमळाची काळजी घ्या, पुढची पाच वर्षे लातूरकरांची काळजी मी घेईन, असा विश्वास देवून यासाठी लातूर मनपात भाजपाचा महापौर बसवा,असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी लातूरकरांना न मागता लातूर-कल्याण महामार्ग दिला. देवाभाऊ हे विकास करणारे नेतृत्व आहे. त्यामुळे लातूरमध्ये त्यांच्याच विचारांची सत्ता असणे आवश्यक आहे. मराठा समाजाला न्याय देण्याचे कामही देवाभाऊंनीच केले आहे. हैदराबाद गॅझेट लागू केल्यामुळे मराठा समाजाला न्याय मिळाला आहे. मागील झालेल्या नगरपालिका निवडणुकांत राज्यात सर्वत्र भाजपाला जनतेने साथ दिली, लातूरकरांनीही प्रवाहासोबत रहावे.मुख्यमंत्री राज्याची तिजोरी लातूरसाठी खुली करतील, असा विश्वास पालकमंत्री भोसले यांनी व्यक्त केला. निवडणुक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले की, जेव्हा देण्याची वेळ येते तेव्हा लातूरला राज्याकडून सर्वाधिक वाटा मिळाला आहे. आताही मुख्यमंत्र्यांनी लातूर कल्याण महामार्ग मंजूर केला. संकटात धावून येणारे नेतृत्व आपल्याला मिळाले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यामुळेच दुष्काळात लातूरला पाणी मिळाले. कोविडच्या काळात सत्ता नसतानाही देवाभाऊंनी मुंबई व नागपूर येथून लातूरला ऑक्सिजनचा पुरवठा केला, असेही आमदार निलंगेकर म्हणाले.

यावेळी बोलताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, देवाभाऊ म्हणजे विकासाचा कोरा चेक आहे. मराठवाड्याचा दुष्काळ मिटविण्यासाठी या भगिरथाने वॉटरग्रीड सारखी योजना दिली. जलयुक्त शिवारच्या माध्यमातून दुष्काळमुक्ती साधण्याचे काम केले, असे त्या म्हणाल्या. यावेळी लिंगायत स्मशानभूमीची अडचण त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडली. प्रारंभी रामचंद्र तिरुके, माजी खा. सुनिल गायकवाड, शैलेश लाहोटी, गोविंद केंद्रे, पाशा पटेल, अजित पाटील कव्हेकर यांची भाषणे झाली. नगरपालिका निवडणुकीत विजयी झालेले निलंग्याचे नगराध्यक्ष संजय हलगरकर, रेणापूरच्या नगराध्यक्ष शोभाताई आकनगिरे, उदगीरच्या नगराध्यक्षा सौ. स्वाती हुडे व अहमदपूरचे नगराध्यक्ष स्वप्नील व्हत्ते यांच्या हस्ते मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला.

या सभेस गणेश हाके, दिलीपराव देशमुख, राहुल केंद्रे, शैलेश गोजमगुंडे, ॲड. रुद्रालीताई पाटील चाकूरकर, गुरुनाथ मगे, सुधीर धुत्तेकर, अविनाश कोळी, ओम धरणे, निखील गायकवाड, अमोल निडवदे यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.







### लढाई काँग्रेसशी - विलासरावांबाबत आदरच

आपल्या भाषणात मुख्यमंत्री म्हणाले की, स्व. विलासराव देशमुख यांची राज्यात वेगळी ओळख होती. पक्षाच्या पलिकडे जावून राज्याच्या जडणघडणीत त्यांचा मोठा वाटा होता. काँग्रेसशी आमची राजकीय लढाई आहे. परंतु, स्व. विलासराव देशमुख यांच्याबाबत मनात कायम आदरच असल्याचे त्यांनी सांगितले.



### मुख्यमंत्र्यांनी स्वीकारले लातूरचे पालकत्व

आपल्या भाषणात मुख्यमंत्र्यांनी लातूरला जे-जे हवे ते सर्वकाही देण्याचा शब्द दिला. लातूरच्या आशा -आकांक्षा पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. आम्ही फक्त आश्वासन देत नाही तर शब्द पाळतो, असे सांगितले. येणाजया १५ तारखेला तुम्ही कमळाचे बटन दाबून भाजपाला मनपाची सत्ता सोपवा, पुढील पाच वर्ष विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशा शब्दात आपण लातूरचे पालकत्व स्वीकारले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत स्पष्ट केले. लातुरात भाजपाच जिंकणार आहे, कमळ फुलणार आहे,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### स्व. चाकूरकर यांचे स्मारक उभारणार

माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी लातूर मनपाच्या आवारात स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांचे स्मारक उभा करावे, अशी मागणी बोलताना केली होती. या मागणीला तत्काळ मंजूरी देताना मुख्यमंत्री म्हणाले की, लातूरने महाराष्ट्राला नेतृत्वदिले आहे. स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांनी नगराध्यक्षपदापासून केंद्रीय गृहमंत्री व लोकसभेचे अध्यक्ष अशी पदे भूषवली. राजकारणात असे लोक दुर्मिळ असतात. स्व. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनीही राज्यात नेतृत्व केले. जन्मभूमी नसली तरी लातूर ही कर्मभूमी असणारे स्व. गोपिनाथराव मुंडे यांचेही लातूरमध्ये आल्यानंतर स्मरण केलेच पाहिजे. नेतृत्व तयार करण्याचा गुण लातूरच्या भूमीत आहे. आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या मागणीनुसार लातूर महानगरपालिका परिसरात स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांचे स्मृतीस्थळ राज्य सरकारच्या वतीने विकसित केले जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचीत बहूजन आघाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ लातूरच्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयासमोर जाहीर प्रचार सभा संपन्न

लातुर/ प्रतिनिधी:-लातुर शहर महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडीकडून लातुर शहरातील विविध प्रभागात जाहीर प्रचार सभांचा धडाका उडवून दिला असून या सभाना मतदार नागरिक बंधू भगिनींचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे. भाग क्र. ९ मधील राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार प्रचारार्थ मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी सायंकाळी ६:०० वाजता लातुर शहरातील महात्मा बसवेश्वर महाविद्यालया समोर जाहीर प्रचार सभा पार पडली. या जाहीर प्रचार सभेसाठी आमदार, महाराष्ट्र विधानसभा, माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्यासह माजी आमदार वैजनाथ शिंदे, मोईज भाई शेख यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले की, लातुर मनपाच्या सार्वत्रिक निवडणूक निमित्ताने आपण एकत्रित आलेले आहोत. राज्यात २९ मनपाची निवडणूक रणधुमाळी सुरू असून १५ तारखेला मतदान होईल व १६ ला निकाल लागेल तेव्हा लातूरची सूत्र कुणाच्या हातात द्यायची, लातूरच्या तिजोरीच्या चाव्या कुणाच्या हातात द्यायच्या याचा निर्णय आपल्याला आता करायचा आहे असे ते म्हणाले. आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर साहेबानी, आदरणीय विलासराव देशमुख साहेबाना घडवले, आदरणीय विलासराव देशमुख साहेबानी, आदरणीय दिलीपराव देशमुख साहेबांना घडविले आणि आदरणीय दिलीपराव देशमुख साहेबांनी आम्हाला घडविले हा काळ तब्बल सहा दशकांचा पण या काळात आम्ही आपल्याशी कधी विश्वासघात केला नाही. आम्ही आपल्या विश्वासाला तडा जाऊ दिला नाही. आज आपण कुठेही गेलात तर लातुर म्हटले की, आदरणीय विलासराव देशमुख साहेबांचे लातुर अशी ओळख आहे, पण विरोधकांकडून ही ओळख पुसण्याची भाषा येथे येऊन काहीजण करू लागले आहेत, आम्ही तर आमचे आदरणीय व्यक्तीमत्वाचे नाव घेतोच पण विरोधकानी देखील आदरणीय विलासराव देशमुख साहेबांचे नाव घेतल्याशिवाय त्यांचे भाषण पूर्ण होत नाही हे यातून दिसते.

लातुरात बाहेरील लोक येऊन लातूरचे लचके तोडण्याचा प्रयत्न करीत असून त्यांचे हे प्रयत्न आपल्याला एकत्रित येत हाणून पडायचे आहेत असे ते म्हणाले. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले की, लातुर शहरासाठी निधी खेचून आणण्यासाठी आपले ट्रिपल इंजिन सरकार असून आपल्याला निधी आजीबात कमी पडणार नाही याची ग्वाही त्यानी दिली. राज्यातील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरकार असणारेच एकमेकांवर भ्रष्ट असल्याचे आरोप करीत असून त्यांना सर्वसामान्य जनतेपेक्षा त्यांच्या खुर्चीची चिंता अधिक आहे. उमेदवारांनी एकमेकात समनव्य राखावा, एकत्रित प्रचार करावा,प्रत्येक घर व मतदारापर्यंत पोहचावे जेणेकरून आपले उमेदवाराणा विजयपासून कोणीही रोखू शकणार नाही विश्वास आमदार अमित देशमुख यांनी उपस्थितांना दिला.दर निवडणूकिला पक्ष बदलणारे लिंबू टिम्बु या निवडणुकीत आपल्या समोर मत मागण्यासाठी येतील आपण सावध राहावे या सर्व गोष्टीचा आपण लातुर वासीयांनी विचार करावा आणि सुरक्षित, भ्रष्टाचार मुक्त,आणि प्रगतशील लातुरसाठी काँग्रेस व वंचित बहुजन अघाडीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिकक्याने विजयी करून लातूरच्या महानगरपालिकेत पाठवावे असे आवाहन शेवटी आमदार देशमुख यांनी उपस्थित सर्व मतदार बंधू-भगिनी नागरिकांना केले.



यावेळी बोलताना काँग्रेसचे नेते मोईज भाई शेख यांनी प्रभाग ८ व प्रभाग ९ मधील राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन अघाडीच्या सर्व उमेदवाराना येणाऱ्या १५ जानेवारीला आपले बहुमोल मत देऊन प्रचंड बहुमताने विजयी कररावे व लातूरचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी पुढाकार घ्यावा व सर्वांना विजयी करून आपल्या सेवेसाठी महानगरपालिकेत पाठवावे असे आवाहन त्यांनी केले.यावेळी बोलताना वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश सचिव मुफ्ती वसीम म्हणाले की, माजी मंत्री, आमदार अमित देशमुख एका बाजूला गोरगरिबांना त्यांचा हक्क देणारे आणि भ्रष्टाचाऱ्यांना त्यांची जागा दाखवणारे नेतृत्व असून यांच्या सोबत आज आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडीची साथ असून यातून आपले व आपल्या कुटुंबाचे कल्याण करणारी आघाडी आपण या निवडणुकीत पाहत आहोत. आपल्याला कुणासमोर न झुकता, न घाबरता सर्वधर्म समभाव जपणाऱ्या आणि आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या विचाराने मार्गक्रमण करणाऱ्या काँग्रेस व बाळासाहेब आंबेडकर यांचे विचार याने प्रेरित वंचित बहुजन अघडीच्या सर्व उमेदवारांना बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.यावेळी बोलताना काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके म्हणाले की, आता लातुर महानगरपालिका निवडणूका लागल्या आहेत आणि या निवडणुकीत प्रचार करताना सुसंकृतपणाचा आव आणत निलंग्याचे आमदार लातुरात मिरवत आहे. ज्या माणसावर आर्थिक गैरव्यवहार केल्याचे फसवणूक केल्याचे गुन्हे दाखल आहेत ते सुसंस्कृतपणा लातुरात येऊन शिकवत आहे असे म्हणत आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांना लक्ष केले. वर्षाला २ कोटी युवकांना नौकऱ्या देणार म्हणणाऱ्यानी १२ वर्षे होऊन गेले तरी अद्याप बेरोजगारी दूर करणे तर सोडाच उलट सुशिक्षित बेरोजगार युवकांचे प्रमाण वाढवले.या संपूर्ण परिस्थितीचा विचार करता आपण वेळीच सावध व्हावे आणि काँग्रेस व वंचित बहुजन अघडीच्या सर्व सामान्य माणसातील आपल्या उमेदवारांना मत देऊन आपल्या प्रभागाच्या आणि लातूरच्या विकासासाठी मनपात विजयी करून पाठवावे असे आवाहन केले. दरम्यान प्रभाग ८ आणि प्रभाग ९ मधील राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडी उमेदवारांनी या जाहीर प्रचार सभेत आपला परिचय देत मनोगत व्यक्त केले आणि बहुमताने आपल्याला विजयी करून लातुर शहर महानगरपालिकेत पाठवावे व सेवेची संधी द्यावी असे आवाहन उपस्थित सर्व मतदार बंधू भगिनी व नागरिकांना यावेळी केले. तसेच यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते राष्ट्रीय काँग्रेस पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.लातुर शहर महानगरपालिका निवडणुक निमित्ताने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या प्रभाग ८ मधील पतंगे अभिषेक,घंटे रिहानाबेगम, झिपरे श्रावणी,उटगे स्नेहल तर प्रभाग ९ मधील स्वामी योगेश,शेख तब्बसुम,किसवे सपना,सगरे ईसरार या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या या जाहीर प्रचार सभेला लातुर जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष-अभय साळुंखे,काँग्रेस पक्ष अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष-प्रा.प्रवीण कांबळे,हमीद शेख,श्रीकांत उटगे,अमर राजपूत, वेंकटेश पुरी,रमेश बिसेन,संतोष बिरादार,रामेश्वर बिरादार,रफिक शेख,मीनाताई सूर्यवंशी यांच्यासह लातूर शहर महानगर पालीका निवडणूककीतील राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार तसेच पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रभागातील मतदार बंधू-भगिनी, नागरीकानी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय...

# बिनविरोध निवड : लोकशाहीचा गळा घोटणारी सत्ता-सोय.

लोकशाही म्हणजे जनतेचा कौल, निवडणूक म्हणजे जनतेचा आवाज आणि मतदान म्हणजे नागरिकाचे अस्त्र. पण आज हाच आवाज मुद्दाम गुदमरवला जात आहे. बिनविरोध निवडून येणे ही प्रक्रिया म्हणून जरी कायदेशीर असली, तरी ती लोकशाहीच्या आत्म्यावर केलेला थेट घाला आहे. ही केवळ निवडणूक न होण्याची बाब नसून, जनतेच्या हक्कांची नियोजित कत्तल आहे.

भारतीय संविधान हे सार्वभौम जनतेच्या अधिकारांवर उभे आहे. या संविधानाने प्रत्येक नागरिकाला निवड करण्याचा अधिकार दिला आहे. पण जेव्हा निवडणूकच होऊ दिली जात नाही, तेव्हा हा अधिकार कागदावरच उरतो. बिनविरोध निवड म्हणजे मतदारांना सांगितले जाते तुमचे मत नको, आमचा निर्णय अंतिम आहे. ही भूमिका लोकशाहीची नसून हुकूमशाहीची आहे.

आज बिनविरोध निवडी मागे जी यंत्रणा कार्यरत आहे, ती अधिक भयावह आहे. राजकीय दबाव, आर्थिक ताकद, सत्तेची दहशत, धमक्या, प्रलोभने आणि प्रसंगी सामाजिक बहिष्कारया सगळ्यांचा वापर करून विरोधकांना मैदानाबाहेर काढले जाते. अर्ज दाखल होऊ नयेत, दाखल झाले तर मागे घ्यायला भाग पाडले जाते. ही प्रक्रिया स्वेच्छेची नसून सक्तीची असते; ती शांत दिसते, पण आतून हिंसक असते.

लोकप्रतिनिधी उत्तरदायी राहतो तो निवडणुकीमुळे. पराभवाची भीती, जनतेचा रोष आणि मतपेटीचा निकालहेच सत्तेला शिस्त लावतात. पण बिनविरोध निवड झाल्यावर ही भीती संपते. मग प्रतिनिधी जनतेकडे नव्हे, तर सत्ताकेंद्रांकडे पाहू लागतो. अशा परिस्थितीत भ्रष्टाचार, मनमानी आणि अहंकार वाढतो. कारण जिथे प्रश्न विचारणारा मतदारच नसतो, तिथे उत्तर देण्याची गरजही उरत नाही.

राजकीय पक्ष बिनविरोध निवडीला राजकीय यश म्हणून साजरे करतात, हीच सर्वात मोठी शोकांतिका आहे. हे यश नाही; हे लोकशाहीचे अपयश आहे. स्पर्धा टाळणे, विरोधक संपवणे आणि मतदारांना डावलणेयाला विजय म्हणायचे असेल, तर लोकशाही शब्दकोशच बदलावा लागेल.

या सगळ्यात भारतीय निवडणूक आयोग आणि न्यायव्यवस्थेची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. निवडणूक ही केवळ कायदेशीर प्रक्रिया नाही, तर नैतिक जबाबदारी आहे. बिनविरोध निवडींचा वाढता आकडा हा लोकशाही आजारी असल्याचा स्पष्ट इशारा आहे. हा इशारा दुर्लक्षित केला, तर उद्या निवडणूक नावालाच उरेल.

लोकशाही म्हणजे सोय नव्हे, संघर्ष आहे. ती सत्ताधाऱ्यांसाठी आरामदायी नसते; ती प्रश्न विचारणारी, विरोध करणारी आणि बदल घडवणारी असते. बिनविरोध निवड ही या संपूर्ण प्रक्रियेवर फास टाकते. मतपेटी बंद ठेवली, तर असंतोष रस्त्यावर उतरणारइतिहास याचा साक्षीदार आहे.

आज गरज आहे ती स्पष्ट भूमिका घेण्याची

बिनविरोध निवड म्हणजे लोकशाहीचा विजय नाही, तर तिचा पराभव आहे.

जनतेचा आवाज दाबणारी कोणतीही सत्ता शेवटी टिकत नाही. लोकशाही वाचवायची असेल, तर निवडणूक लढवली गेलीच पाहिजेखरी, मुक्त आणि निर्भय.

# समाजाचं पारध करणारी वृत्तपत्र!

मागील काही वर्षांचा वृत्तपत्रिय आढावा घेतला असता असे लक्षात येते की, काही संपादकासह वृत्तपत्राचे चरित्र आणि चारित्र्य हे दोन्ही वृत्तपत्र सृष्टीला साजेसे आहेत की नाही? हा चर्चेचा आणि गंभीर विषय आहे. कारण आजची प्रचार-प्रसार माध्यमांची (अपवाद वगळता) बेगडी भूमिका जनतेच्या शोधक नजरेत कैद झाली आहे. काहींचे कार्य मात्र त्याला अपवादच नाही तर डॉ. वारींवरीसरारळश्र. ले बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणाऱ्या वृत्तपत्र जगताला अनुरूप असून, ते समाजाचं पारध (टेहळणी) करणारी आहेत. पत्रकारिता तथा मीडिया क्षेत्रातील काहींचा हा कांतीप्रवास आज अविरत सुरू आहे. तसेच त्यांची ठेवणही महाराष्ट्राच्या पुरोगामीत्वाला साजेशी व एकरूप आहे. पुरोगमित्वाच्या झालरीमुळे ते समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्व या संविधानिक तथा महान मानवी मूल्यांना प्राधान्य देतात. त्यामुळे त्यांच्याकडे तळवेचाटू तथा चाटूगिरीला अजिबात वाव दिसून येत नाही. कारण आज अनेकांना तशी वाळवी लागल्याचे बोलले जाते. कित्येकांनी स्वतःला विविध पक्ष-संघटनांच्या खुंट्याला बांधून घेतले, तर काही त्यांचीच बपौती असल्यामुळे आपल्या स्वार्थापोटी आणि भल्यासाठी देशाचं भवितव्यही ते वेशीला टांगायला मागेपुढे पाहत नाहीत. त्यामुळे त्यांना लोकशाहीचा आधारस्तंभ म्हणावा की नाही? हाही प्रश्न निर्माण झाला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लोक, विचार तथा प्रचार-प्रसार माध्यमाच्या रूपान समाजाचं पारध करणारी यंत्रणा अपेक्षित होती. जेणेकरून समाजाचं संरक्षण होईल. मग ते कोणी करावं? कशासाठी करावं? व का करावं? असे एक ना अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात.

इतिहासाचा आढावा घेतला असता समाजावर अनेकविधं अन्याय अत्याचार झाल्याचे दिसून येतात. ते सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक तथा राजकीय आणि आणखीही वेगवेगळ्या रूपाने असण्याची शक्यता नाकारता येत नाही. एक वेळ तर अशी होती, की बहुजन समाजाला नैसर्गिक हक्क अधिकारही नाकारण्यात आले होते. त्यांच्या स्पर्शाचाच नव्हे तर सावलीचाही विटाळ होत होता. त्यांचं वर्णन वामनदादांनी आपल्या एका कवितेच्या ओळींमध्ये केलेले दिसून येते, ते म्हणतात.

गावामधलं शिळ खरकटं आणीत<br>
होती आजी।<br>
नव्हती राजी तुझ्या कुडीला ताजी<br>
भाकर भाजी।<br>
अंग झाकाया मुडद्यावरचे आणीत<br>
होते कपडे।<br>
तरी बिचारे अंग तयाचे अर्धेनिर्धे<br>
उघडे।*

याचा अर्थ असा की, इथल्या मनुवादी, विषमतावादी, ब्राह्मण्यवादी, तसेच वर्णवर्चस्ववादी व जातीयवादी व्यवस्थेने एका विशिष्ट गटाला ज्यांना आम्ही आज बहुजन समाज (एससी, एसटी, ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी) असे संबोधतो त्यांच्यामध्ये क्रमिक असमानता निर्माण करून त्यांना कमी-अधिक प्रमाणात हक्क अधिकारांपासून वंचित ठेवलं. जेणेकरून त्यांच्यामध्ये संघटन निर्माण होऊ नये. तसे झालं तर ते बंड करतील व आपण अल्पसंख्यांक ठरून त्यांच्यासमोर आपला टिकाव लागणार नाही.

बहुजन समाजापैकी शूद्रांसाठी मनुस्मृतीचे नियम होते. जसे की,

शक्तीनापेन: शुद्रोही नकार्य धनसंचय:<br>
शिद्रोही धनमासाध्य ब्राम्हणेन:<br>
बाध्यते।<br>
( अध्याय १० श्लोक क्र. १२९)

वरील श्लोकाचा अर्थ ढोबळमानाने असा सांगता येईल की, शूद्राकडे धनाचा आणि ज्ञानाचा संचय होता कामा नये, असे झाल्यास ते ब्राम्हण्याला बाधक ठरते.

परंतु अतिशूद्र म्हणजेच अस्पृश्य (स्पर्श करण्यास अयोग्य) समूहाने तर शिक्षण घेऊ नये, नवीन कपडे परिधान करू नये, ताजं अन्न खाऊ नये, तांब्या पितळीची भांडी वापरू नये, पंचांच्या पंक्तीत चपातीचे भोजन वाढू नये, नवरदेवाला घोड्यावर बसवू नये, संपत्तीचा संग्रह करू नये असे एक ना अनेक ग्रामभट सांगतील तेच नियम होते.

या सर्वाचं समाजातून उच्चाटन होऊन मानवाचं उत्थान होण्यासाठी संत महापुरुषांनी वर्षानुवर्ष खस्ता खाल्लया. त्याग, कष्ट, समर्पण दिलं. मानवी साधन संसाधनांसह प्रचार-प्रसार माध्यम उभी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर मुखपत्र नसणाऱ्या एखाद्या सभा, संघटनेची तुलना ही पंख नसलेल्या पक्षांसोबत केलेली आहे. म्हणूनच त्यांनी आपल्या हयातीत एकच नवे तर, तब्बल चार-चार वृत्तपत्र सुरू केली. ती सर्व व्यवस्था परिवर्तनाच्या दिशेने म्हणजेच मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी होती. त्यांचं पहिलं वृत्तपत्र नावाप्रमाणेच पिढीजात मुक्यांचं प्रतिनिधित्व करणारं 'मूकनायक' असं होतं. त्याची पहिली जाहिरात टिळकांच्या केसरीने पैसे घेऊनही प्रकाशित करण्यास नाकारली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची काही वृत्तपत्र साधन संसाधनांऐवजी बंद पडली. परंतु त्यांनी थोडीही कच खाल्ली नाही. वृत्तपत्र कुणाच्याही दावणीला बांधली नाहीत. आज त्यांच्या सर्व वृत्तपत्रांचं वृत्तांकन हे महाराष्ट्र शासनाने खंडरूपाने प्रकाशित केल्यामुळे त्यातील आदर्शता समाजासह संपूर्ण विश्वातील वृत्तपत्रीय जगताला प्रेरणा तथा दिशादर्शक ठरत आहे.

आज घडीला काही माध्यमं त्याच वाटेवरील वाटसरू भासत आहेत. काही संपादकांचे व्यक्तिमत्व चळवळीसाठी सर्वांगाने ओतप्रोत आहे. सुरू झालेला त्यांचा प्रवास आज महाराष्ट्र भूमी कवेत घेऊ पाहते आहे. समाजप्रबोधनाच्या अनेक मार्गांपैकी वृत्तपत्रांच्या माध्यमातून ते समाज प्रबोधन करण्यासाठी सदैव तत्पर असतात. फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीला त्यांच्या कार्यात अग्रस्थान देतात. ते सर्व सांभाळून क्रांतीचा प्रवास हा अविरत व अश्वगतीने सुरू ठेवतात.

कोणताही व्यक्ती किंवा वृत्तपत्र स्वतःला चळवळीचे वाहक म्हणून घेत असेल, तर त्याच्या ठाई नीतिमत्ता, प्रामाणिकता आणि मानवी मूल्यांना प्राधान्य हे प्राधान्यक्रमानेच असावे लागते. ते त्यांच्या वर्तनातून प्रतीत होऊन व्यक्तित्वात ओसंडून वाहताना दिसले पाहिजे.

चळवळीच्या रथाची आगेकूच करण्यामध्ये प्रचार-प्रसार माध्यमांचा सर्वात मोठा वाटा असल्याचा इतिहास साक्ष देतो. कारण ते समाजाचं निस्वार्थ पारध करत असतात. परंतु आज त्या रथाची वाटचाल धीमी होताना दिसत आहे. त्याची चाकं निखळतात की काय? असा भास होताना दिसतो. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर नानकचंद रत्तूला एके ठिकाणी म्हणतात की, हा प्रगतीचा रथ समाजाला पुढे नेता आला नाही तरी चालेल. परंतु तो मागे जाता कामा नये. आज सर्वात जास्त ती जबाबदारी चळवळीला पोषक असणाऱ्या वृत्तपत्रांची आहे.

आज देशापुढे अनेक समस्या 'आ' वासून उभ्या असून अनेक क्षेत्रांतील प्रगतीचा आलेख उलटा प्रवास करताना दिसत आहे. आंतरराष्ट्रीय सर्वेमधील अनेक राष्ट्रांच्या तालिकेतील भारताचा क्रमांक शरमेने मान खाली घालावी असाच आहे. महागाईचा दर, सांप्रदायिकता, वाढती बेरोजगारी, त्यामुळे नैराश्याला सामोरे जाऊन व्यसनाधीन होणारी तरुणाई यावर चर्चा होऊन जबाबदारांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करताना कित्येकांच्या लेखणीतील शाही संपून हाता-तोंडाला लखवा मारला की काय? अशी शंका येण्यास वाव आहे. परंतु अपवादांसह काही वृत्तपत्र आपली संविधानिक जबाबदारी लोकशाहीला पोषक असणाऱ्या दिशेने पार पाडताना दिसत आहे. ती जबाबदारी काहींचीच नसून सर्वांचीच आहे. म्हणून ती त्यांनी अविरत पार पाडावी अशी भारतीय जनतेची अपेक्षा आहे.

समाजाचं निस्वार्थ पारध करण्यास त्यांच्या लेखणीतील बळ दिवसेंदिवस वाढत जावो व महापुरुषांच्या स्वप्नातील आणि समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्व या महान मानवी तथा संविधानिक मूल्यांवर आधारित भारत आकार घेण्यास त्यांचा सदैव हातभार लागो हीच एका लेखकाच्या लेखणीचीही अपेक्षा......

**भमराव परघरमोल**<br>
**व्याख्याता तथा अभ्यासक**<br>
**फुले शाहू आम्बेडकरी विचारधारा**<br>
**तेल्हारा जि. अकोला**<br>
**मो. ९६०४०५६१०४**

# लातूर ग्रामीणमधील चारशे आशा स्वयंसेविकांना आ. कराड यांनी दाखवला आशा चित्रपट



लातूर – ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा स्वयंसेविकांच्या कार्यावर प्रकाश टाकणारा त्यांची कहाणी मांडणारा राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट पुरस्कार प्राप्त आशा हा सिनेमा आ. रमेशआप्पा कराड यांच्या वतीने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील चारशे आशा स्वयंसेविकांना मंगळवारी दाखवण्यात आला. यावेळी युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड हे आवर्जून उपस्थित होते. सिनेमागृहातून चित्रपट पाहून बाहेर आल्यानंतर ऊर्जा मिळाल्याचे प्रत्येक आशा स्वयंसिकांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते.

ग्रामीण भागातील महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यामध्ये आशा स्वयंसेविकांचे मोठे योगदान असून त्यांचे कार्यावर प्रकाशझोत टाकणारा आणि ग्रामीण भागाचे वास्तव सांगणारा आशा हा सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला या सिनेमात अभिनेत्री रिंकू राजगुरू यांनी आशा स्वयंसेविकेच्या भूमिकेला न्याय दिला असून पगारीसाठी नव्हे तर स्वतः च्या समाधानासाठी काम करणाऱ्या (मालती) आशा हिच्या चेहऱ्यावर संयम, डोळ्यात तगमग आणि आतून असणारी जिद्द दिसून आली. चालत रहा पुढे हे गीत प्रेक्षकांना ऊर्जा देऊन जाते.

चित्रपट सुरू होण्याअगोदर उपस्थित आशा स्वयंसेविका यांच्याशी संवाद साधताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, आशा स्वयंसेविकांचे समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणारे मोठे कार्य आहे या कार्याची आ. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी दखल घेतली असून प्रेरणा मिळावी यासाठीच आशा चित्रपट दाखविण्याचा सुयोग त्यांनी घडून आणला आहे असे बोलून दाखवले.

याप्रसंगी भाजपाचे वसंत करमूडे, चंद्रकांत कातळे, भाऊसाहेब गुळबिले, ओम चव्हाण, राम भताने, दिलीप पाटील, सुरेखा पुरी, अनुसया फड, शीला आचार्य यांच्यासह स्वयंसेविका जिल्हा समूह संघटक संगीता डावरे, श्रीमती बालिका बिराजदार, तालुका संघटक आढळकर, रेखा कौटबे, जयश्री थोरमोटे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती यावेळी तब्बल चारशे आशा स्वयंसेविकांनी चित्रपट पाहण्याचा आनंद घेतला.

# सख्खे भाऊ राजकीय प्रतिस्पर्धी; एकाच अंगणात भाजप अन् राष्ट्रवादीचा झेंडा



नागपूर : राज्यात सध्या महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. मतदानासाठी आता अवघ्या काही दिवसांचा अवधी शिल्लक राहिल्याने प्रचारालाही वेग प्राप्त झाला आहे. राज्यातील अनेक प्रभागात बिनविरोध निवडणूक झाली असून त्यावरून राजकारण देखील तापलं आहे. असे असताना नागपूरच्या प्रभाग २६ मध्ये दोन सख्खे भाऊ निवडणुकीच्या मैदानात एकमेकांच्या समोर उभे ठाकले आहे. भाजपनं प्रभाग २६ मधील अनुसूचित जाती प्रवर्गासाठीच्या जागेवरून ड. धर्मपाल मेश्राम(वीं.उ्हरीरारिश्रि चशीहीरा) यांना उमेदवारी दिली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून धर्मपाल मेश्राम यांचे सख्खे मोठे भाऊ ड. यशवंत मेश्राम (वीं धरीहुरपीं चशीहीरा) निवडणूक लढवत आहेत. (वीं.उ्हरीरारिश्रि चशीहीरा ीी वीं. धरीहुरपीं चशीहीरा)

विशेष म्हणजे दोघेही अनुभवी राजकारणी असून नागपूर महापालिकेत नगरसेवक राहिले आहे. दोघांचे घर ही अगदी शेजारी शेजारी असून सध्या दोन्ही घरातून निवडणुकीचे डावपेच आखले जात आहेत. एवढेच नाही तर परिसरातील काही लोक कमळचा प्रचार करत आहेत. तर काहीजण हातावर घड्याळ बांधून प्रचाराला उतरले आहेत. त्यामुळे दोन सख्ख्या भावांमधील ही राजकीय लढत नागपुरात लक्षवेधी ठरत आहे.

दरम्यान, याबाबत बोलताना दोन्ही भावांनी एकमेकांवर आरोप केलेय. ही कौटुंबिक नव्हे तर पूर्णपणे वैचारिक आणि राजकीय लढाई असल्याचे मत दोघांनी व्यक्त केले आहे. लहान भाऊ धर्मपाल मेश्राम यांनी स्वतःची बांधिलकी भाजपसोबत घट्ट असल्याचे सांगत त्यांनी मोठ्या भावासारखे वारंवार पक्ष बदलले नसल्याचा दावा केला आहे. तर मोठे भाऊ यशवंत मेश्राम यांनी लहान भावावर मतदारांकडे, प्रभागाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला आहे.

नागपूरच्या प्रभाग ३१ म्हणजेच रेशिमबाग प्रभागातून अति सामान्य कुटुंबातील गणेश चर्लेवार (ऋपशीह उहरीश्रशुरी) या अनुसूचित जातीच्या स्वंयसेवकाला महायुतीची (इगझ-डहळीं डशपर श्रश्रळरपलश) उमेदवारी मिळाली आहे. महापालिकेत गेले दोन दशक चपराशी म्हणून नोकरी करणाऱ्याच्या मुलाला त्याच महापालिकेत नगरसेवक होण्याची संधी देण्यात आली आहे. सोबतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या रेशीमबाग प्रभागात भाजप शिवसेना युतीकडून गणेश चर्लेवार या अनुसूचित जातीच्या आणि अत्यंत गरीब तरुणाला उमेदवारी देण्यात आली आहे. परिणामी, व्हीव्हीआयपी नेत्यांच्या कुटुंबातील पॅराशुट उमेदवारांच्या या काळात गणेश चर्लेवारची उमेदवारी नागपुरात चर्चेचा विषय ठरली आहे.

# 'दर्पण' दिनानिमित्त दै. लोकवाहिनीच्या विशेषांकाचे माहिती संचालक डॉ. गणेश मुळे यांच्या हस्ते प्रकाशन



'दर्पण' दिनानिमित्त दै. लोकवाहिनीच्या विशेषांकाचे माहिती संचालक डॉ. गणेश मुळे यांच्या हस्ते प्रकाशन

–जानेवारी

नागपूर: आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या दर्पण साप्ताहिकामुळे साजऱ्या होणाऱ्या मराठी पत्रकार दिनाच्या औचित्याने प्रकाशित दै.लोकवाहिनीच्या विशेषांकाचे आज नागपूर-अमरावती विभागाचे माहिती संचालक डॉ. गणेश मुळे यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

माहिती संचालक कार्यालयात औपचारिकरित्या हे प्रकाशन पार पडले. यावेळी लोकवाहिनी वृत्तपत्राचे समूह संपादक डॉ. प्रवीण महाजन, विशेषांकाचे मानद संपादक नितीन कुळकर्णी, जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतपावर आदी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत बालिकादिन साजरा.

केज/प्रतिनिधी.-जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेत क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या



जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस या शाळेतील इ.६ वी व इ.७ वी वर्गातील विद्यार्थीनींनी पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले.क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचा जन्म महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे ३ जानेवारी १८३१ रोजी झाला.वडील खंडोजी नेवसे पाटील हे होते व आईचे नाव लक्ष्मीबाई असे होते.क्रांतीज्योती ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या ९ व्या वर्षी महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी विवाह झाला. त्या महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती होत्या.त्यांनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यात भिडेवाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली.त्यांचा १० मार्च १८९७ रोजी मृत्यू झाला.३ जानेवारी हा दिवस बालिकादिन, महिलामुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांनी समाज सुधारणा चळवळ करुन अनेक उत्कृष्ट कामगिरी केली. आजही समाजाने त्यांच्या कार्याचा आदर्श घेण्यासारखे त्यांनी उत्कृष्ट कार्य केले. असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले.यावेळी या शाळेतील आदर्श प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ.श्री.रामकिशन ग्यानबा मुळे सर,श्री.आकाश दत्तु लोंढे सर, राहुल बजरंग बचुटे सर, प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री.संदीप मेघराज ठोंबरे सर, श्री आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती भोरे निलावती आनंदराव मॅडम, श्रीमती उटीकर अंजली गोविंदराव मॅडम, ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे/थोरात मॅडम यांनी सविस्तर माहिती दिली.या कार्यक्रमात इ.१ ली,७ वी वर्गातील या शाळेतील जवळपास ८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी विद्यार्थिनींनी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर आधारित अनेक गीत सादर केली.या कार्यक्रमानिमित्त रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येऊन प्रोत्साहनपर बक्षीस वितरण करण्यात आले.या कार्यक्रमास  या गावचे सरपंच श्री अविनाश पांचाळ,उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा सौ.शालु विजय थोरात, उपाध्यक्षा सौ.अश्विनी श्रीकांत थोरात, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सौ.संध्या अशोक थोरात, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षणप्रेमी नागरिक, अंगणवाडीताई,मदतनिस , पीएमपोषण शक्ती निर्माण कामगार स्वर्णमाला पवार,अनिता पवार,मातापालक असे अनेक गावकरी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इ.७ वी वर्गातील आर्या अमोल थोरात या विद्यार्थीनींने अतिउत्कृष्ट केले. आभार पद्मजा थोरात यि विद्यार्थिनीने मानले.

# स्वामी विवेकानंद शाळेतील विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धेमध्ये नेत्रदीपक यश

केज/प्रतिनिधी.-जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले.




तुळजापूर येथील स्वतंत्र संग्राम सेनानी जयवंतराव भानुदासराव धुरगुडे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या मराठवाडा पातळीवरील सामान्य ज्ञान स्पर्धा, रुक्मीनबाई बजाज काम खेडकर सुगम गायन स्पर्धा रेणापुर, इंटर स्टेट चॅम्पियनशिप कराटे स्पर्धा मध्य प्रदेश, तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन या सर्व स्पर्धेमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. त्याबद्दल जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक दत्ता सत्वधर, प्रबोधकांत समुद्रे, धनराज मैंद यांच्या उपस्थितीमध्ये सर्व विद्यार्थ्यांचा पालकासह सत्कार करण्यात आला.

तुळजापूर येथील स्वतंत्र संग्राम सेनानी जयवंतराव भानुदासराव धुरगुडे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या मराठवाडा पातळीवरील सामान्य ज्ञान स्पर्धेमध्ये घुले प्रज्ञा दिनकर सर्वप्रथम यादव हिंदवी विष्णू सर्वतृतीय, गायकवाड ज्ञानदा सुनील सर्वचतुर्थ येण्याचा बहुमान मिळविला. रुक्मीनबाई बजाज काम खेडकर सुगम गायन स्पर्धा रेनापुर या स्पर्धेत देशमुख सुसंस्कृती विनोद हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले, इंटर स्टेट चॅम्पियनशिप कराटे स्पर्धा मध्य प्रदेश यामध्ये मुळे आदर्श हनुमंत याला गोल्ड मेडल मिळाले तसेच तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन यामध्ये विवेकानंद शाळेला सर्वद्वितीय पारितोषिक मिळाले. यातील सहभागी विद्यार्थी बेडस्कर शिवम सुग्रीव, इंगळे कृष्णा ज्ञानेश्वर, नेहरकर रोहित कैलास इत्यादी. वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे दत्ता सत्वधर, प्रबोधकांत समुद्रे, धनराज मैंद यांचेही याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले.

# बोरगाव काळे येथील पांडुरंग देडे या शेतकऱ्यास २५ वर्षापासून शेतरस्ता मिळालाच नाही

लातूर : लातूर तालुक्यातील बोरगाव काळे येथील शेतकरी पांडुरंग देडे यांची गट क्र. ३३२ मध्ये चार एकर शेत जमीन आहे. मात्र या शेताला जाण्यासाठी शेत रस्ता मिळावा यासाठी पांडुरंग देडे यांनी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी,

पालकमंत्री यांच्याकडे वारंवार अर्ज विनंत्या करूनही अद्याप पर्यंत रस्ता मिळालेला नाही.

५ जानेवारी रोजी तहसीलदारांच्या आदेशाने भूमी अभिलेखचे भुमापक आढाव, तलाठी आशुतोष कांबळे, मंडल अधिकारी भुजबळ हे शेतीची हद्द व खुणा करून देण्यासाठी ५ जानेवारी रोजी शेतावर आले. मात्र भुमापक आढाव हे पळून गेले. त्याबाबतचा पंचनामा मंडल अधिकारी यांच्या समक्ष करण्यात आला. शेतत्यासाठी नोटीसा देऊनही आतापर्यंत पाचवेळा असा प्रकार घडला आहे. प्रशासनाकडून ठोस कार्यवाही केली जात नाही, असे शेतकरी पांडुरंग देडे यांचे म्हणणे आहे. प्रत्येकवेळी तहसीलदारांच्या आदेशाने मंडल अधिकऱ्या मार्फत नोटीसा देऊनही, गैरहजर राहणे आणि पोलीसांचे सहकार्य मिळत नाही.. महसूल विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी टाळाटाळ करत आहेत. माझ्या शेताचा शेतरस्ता मिळवून द्यावा, अशी मागणी शेतकरी पांडुरंग देडे यांनी एका निवेदनद्वारे केली आहे. शेत रस्ता न मिळाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा पांडुरंग देडे यांनी दिला आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस -रिपब्लिकन सेना युतीच्या उमेदवारांचा प्रभाग ७ मधील गल्लीबोळात प्रचार

लातूर :  लातूर महानगरपालिका निवडणीकीचा प्रचार शहरातील प्रभाग सातमध्येजोरदार सुरु झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस व रिपब्लिकन सेना युतीचे अधिकृत उमेदवार  सचिन मस्के, एश्वर्या चिकटे आणि अब्दुल गफार रज्जाक मणियार यांचा जोमात प्रचार सुरु आहे. आज ६ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात या उमेदवारांनी हत्तेनगर, अन्सार कॉलनी, म्हैसूर कॉलनी,  ६० फुटी रोड,



साळे गल्ली, बौद्ध नगर  या भागात पायाला भिंगरी लावून जास्तीत जास्त मतदारांना भेटण्याचा प्रयत्न केला. उमेदवारांनी मतदारांच्या घरापर्यंत, दुकानावर जाऊन गाठीभेटी घेतल्या आणि आपाल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार या पक्षाला घड्याळाच्या चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन केले. तसेच प्रचारा दरम्यान मतदार नागरिकांच्या समस्या उमेदवारांनी जाणून घेतल्या. आणि त्या समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले. या प्रचार रॅलीत राष्ट्रवादी काँग्रेस, रिपब्लिकन सेना, व्ही. एस. पॅन्थर संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# 'पालकमंत्री आपल्या दारी' उपक्रमांतर्गत प्राप्त अर्जावर गतीने निपटारा करा पालकमंत्री शंभूराज देसाई

सातारा,: 'पालकमंत्री आपल्या दारी' उपक्रमांतर्गत प्राप्त अर्जांवर कार्यवाही सुरु झालेली आहे. ही समाधानाची बाब आहे. पण जोपर्यंत अर्जदाराचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत यंत्रणेचे काम संपत नाही.



लोकांना वेळेत न्याय मिळणे, त्यांची कामे सकारात्मक पद्धतीने मार्गी लागणे ही बाब आवश्यक आहे. पालकमंत्री आपल्या दारी हा उपक्रम याच दृष्टीने महत्त्वाचा आहे. प्रत्येक विभागाने त्यांच्याशी संबंधित अर्जांचा गतीने निपटारा होईल याबाबत अत्यंत दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री कार्यालय आपल्या दारी या उपक्रमाचा आढावा पालकमंत्री देसाई यांनी घेतला. या आढावा बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अभय काटकर, जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने, पाटणचे प्रांताधिकारी सोपान टोम्पे, तहसीलदार अनंत गुरव, कराडच्या तहसीलदार कल्पना ढवळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

कोणत्याही स्थितीत यंत्रणांनी नागरिकांची कामे रखडवणे, विलंब करणे, नकारात्मक प्रतिसाद देणे, लोकांना हेलपाटे मारावयाला लावणे या पद्धतीचा प्रतिसाद खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा देऊन पालकमंत्री देसाई म्हणाले, पालकमंत्री कार्यालय आपले दारी या उपक्रमांतर्गत १ सप्टेंबर ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत ४ हजार ८१९ अर्ज प्राप्त झाले असून २ हजार ४०६ अर्जांवर कार्यवाही सुरु आहे. ७२० अर्जांवर कार्यवाही पूर्ण तर अद्याप १ हजार ४९९ अर्जांवर कार्यवाही पूर्ण झालेली नाही या अर्जांवर तातडीने निर्णय घ्यावा, असेही निर्देश दिले.

पालकमंत्री कार्यालयाकडे नवीन शिधापत्रिकेसाठी मागणी होत आहे. मागणीनुसार नागरिकांना शिधापत्रिका देण्याची कार्यवाही करावी. पीएम किसान, नमो शेतकरी योजने कृषी विभागाने नवीन शेतकऱ्यांची नोंदणी करुन केंद्र व राज्य शासनाचा लाभ मिळेल या दृष्टीने काम करावे. 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' शासनाची महत्वाकांक्षी योजना आहे. पाटण तालुक्यातील या योजनेच्या महिला लाभार्थ्यांना पैसे मिळणे बंद झाले आहे. या महिलांना योजनेंतर्गत पैसे मिळावे, यासाठी जिल्हा महिला व बाल विभागाने मंत्रालयस्तरावर पाठपुरावा करावा, असे निर्देश देऊन पाटण तालुकास्तरावरील प्रलंबीत अर्जांचा टोम्पे यांनी वेळोवेळी आढावा घ्यावा तसेच जिल्हास्तरावरील अर्जांचा आढावा घेण्यासाठी उपजिल्हाधिकारी पदाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, असे ही पालकमंत्री देसाई यांनी सांगितले.

# ग्रंथालय चळवळीला नवे बळ देण्यासाठी शासनाचे सर्वतोपरी सहकार्य- मंत्री चंद्रकांत पाटील

मुंबई, : ग्रंथालय चळवळीला नवे बळ देण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी केले. मंत्रालयात राज्य ग्रंथालय परिषदेच्या



बैठकीस मंत्री पाटील दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन केले.

यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, सहाय्यक धर्मदाय आयुक्त राम लिप्ते, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग उपसचिव तुषार महाजन, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अमोल मुत्याल, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेवार,  ग्रंथालय संघ अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रभाकर घुगे, ग्रंथालय संघ मराठवाडा विभागाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, पुणे विभागाचे अध्यक्ष सोपान पवार, कोकण विभागाचे अध्यक्ष दिलीप कोरे, डॉ. सिद्धी जगदाळे, डॉ. सुभाष चव्हाण, सुनील वायाळ व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले की, राज्य शासनाच्या निर्णयानुसार १६ वर्षांनंतर राज्य ग्रंथालय परिषद पुन्हा गठीत करण्यात आली आहे. राज्य ग्रंथालय परिषद ही ग्रंथालय चळवळ अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनास सल्ला देणारी प्रमुख परिषद आहे. ग्रंथालय चळवळ सक्षम करण्यासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ देण्यात येणार असल्याचे तसेच ग्रंथालय व्यवस्थापनाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस निर्णय घेण्यात येणार असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले.

बैठकीत ग्रामीण भागात वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी सीएसआर निधी किंवा राजा राममोहन रॉय योजना यांच्या माध्यमातून मोबाईल वाचन व्हॅन खरेदी करून ती गावे, शाळा आणि दुर्गम भागांमध्ये नेऊन वाचन उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. गाव तिथे ग्रंथालय उपक्रम राबविण्यासाठी ग्रामविकास विभागाशी समन्वय साधण्याचे निश्चित करण्यात आले.

राज्य मध्यवर्ती ग्रंथालय व ६ विभागीय ग्रंथालयांमध्ये फिरते ग्रंथालय सेवा देणे योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरु करणे,  तसेच ई-लायब्ररी, ई- लायब्ररी युनिक डेटाबेस, फिरते वाचनालय आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. सार्वजनिक ग्रंथालयाचे नियतकालिक तीन वर्षानंतर तपासणी करण्यास मंजुरी देण्यात आली.

बैठकीत ग्रंथालय संचालनालयाच्या २००८-०९ ते २०२४-२५ या वर्षातील अहवालांना मंजुरी देण्यात आली.

# जवाहर नवोदय विद्यालयातील अल्पवयीन विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणी लातूर पोलिसांचा तात्काळ, संवेदनशील व पारदर्शक कायदेशीर तपास.

लातूर :-लातूर जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालय, चिंचोलीराववाडी येथील अल्पवयीन विद्यार्थिनी कु. अनुष्का किरणकुमार पाटोळे (वय १२ वर्षे) हिच्या दिनांक ०४/०१/२०२६ रोजी झालेल्या दुर्दैवी मृत्यू प्रकरणी एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, लातूर येथे गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून या संवेदनशील प्रकरणाचा तपास अत्यंत गांभीर्याने, पारदर्शकपणे व कायद्याच्या चौकटीत करण्यात येत आहे.

दिनांक ०५/०१/२०२६ रोजी फिर्यादी किरणकुमार श्रीमंत पाटोळे (रा. टाका, ता. औसा, जि. लातूर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. एमआयडीसी, लातूर येथे गु.र.नं. ०४/२०२६ कलम १०८,११५(२),३(५) भारतीय न्याय संहिता सह कलम ३(२)(तर),३(१)(ी)(ी) अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला.

फिर्यादीच्या तक्रारीनुसार, मयत मुलगी जुलै २०२५ पासून जवाहर नवोदय विद्यालयातील इयत्ता सहावीच्या वर्गात शिक्षण घेत होती आणि विद्यालयाच्या मुलींचे वसतिगृहात वास्तव्यास होती. तक्रारीत नमूद आरोपींनी मयत अनुष्का हिचा केलेला मानसिक व शारीरिक छळ तसेच इतर बाबी लक्षात घेऊन लातूर पोलिसांनी कोणताही विलंब न करता तपासाची चक्रे तात्काळ फिरवली.

दिनांक ०४/०१/२०२६ रोजी दोन शासकीय पंचांच्या उपस्थितीत घटनास्थळ पंचनामा करण्यात आला असून ई-साक्ष ॲपद्वारे व्हिडिओ व छायाचित्रण करण्यात आले आहे. तसेच महिला पोलीस अधिकारी यांच्या उपस्थितीत इन-कॅमेरा शवविच्छेदन करण्यात आले असून वैद्यकीय अहवाल, प्रोव्हिजनल कॉज ऑफ डेथ प्रमाणपत्र ताब्यात घेण्यात आले आहे. व्हिसेरा व अन्य नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविण्याची कार्यवाही सुरू आहे.

प्राथमिक तपासात निष्पन्न झालेल्या पुराव्यांच्या आधारे आरोपी पल्लवी सचिन कणसे, लता दगडू गायकवाड यांना दिनांक ०६/०१/२०२६ रोजी कायदेशीररीत्या अटक करण्यात आली आहे. आरोपींना मा.न्यायालयासमोर हजर केले असता मा. न्यायालयाने आरोपींची दिनांक ०९ /०१/२०२६ पावेतो पोलीस कोठडी दिली आहे.

शाळा, वसतिगृह व संबंधित साक्षीदारांचे सविस्तर जबाब नोंदविण्यात आले असून बी.एन.एस.एस. कलम १८३ अन्वये न्यायालयीन जबाब नोंदविण्याची कार्यवाही सुरू असून सीसीटीव्ही फुटेज, शाळेचे रजिस्टर, उपस्थिती नोंदी, कर्मचारी जबाब व इतर संबंधित कागदपत्रे हस्तगत करण्यात येत आहे.

या अत्यंत संवेदनशील व समाजमन हेलावून टाकणाऱ्या घटनेत लातूर पोलिसांनी तात्काळ दखल घेत,पीडित कुटुंबाला न्याय मिळावा तसेच नमूद गुन्ह्यातील कोणताही दोषी सुटू नये या उद्देशाने कार्यवाही केली जात असून सदर गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक, लातूर श्री. अमोल तांबे यांच्या थेट मार्गदर्शनाखाली श्री समीर साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर व त्यांचे विशेष पथकाकडून करण्यात येत असून अपर पोलीस अधीक्षक यांच्याकडून सातत्याने देखरेख ठेवण्यात येत आहे.

लातूर पोलीस प्रशासन समाजातील दुर्बल घटक, विद्यार्थी व अल्पवयीन मुलांच्या सुरक्षिततेबाबत अत्यंत कटिबद्ध असून, अशा प्रकारच्या कोणत्याही अमानवी, बेकायदेशीर व अन्यायकारक कृत्यांविरोधात शून्य सहनशीलता नशी ढेश्रशीरपलश धोरण राबवित आहे. या प्रकरणात दोषींवर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

# केज येथील सरस्वती कन्या प्रशाला येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती व बालिका दिन मोठ्या उत्साहात साजरा

केज/प्रतिनिधी-केज येथील सरस्वती कन्या प्रशाला विचार मांडले.



येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती व बालिका दिन विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे. याप्रसंगी बोलताना मुख्याध्यापिका तथा प्राचार्या श्रीमती डोंगरे मॅडम म्हणाल्या की, विद्यार्थिनींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेण्याचा काळाची गरज आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व बालिका दिनाचे औचित्य साधून सरस्वती कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका तथा प्राचार्या श्रीमती डोंगरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली वेशभूषा व वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका तथा प्राचार्या श्रीमती डोंगरे मॅडम तर प्रमुख पाहुणे म्हणून महिला पालक श्रीमती मीरा गवळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या व शिक्षक वृंदांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या स्पर्धेसाठी विद्यार्थिनींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, जिजाऊ मॉसाहेब यांच्या वेशभूषा साकारल्या होत्या, प्रत्येक वेशभूषा साकारलेल्या विद्यार्थ्यांनी आप आपल्या वेशभूषा मनोगत व्यक्त करून

वेशभूषा साकारलेल्या विद्यार्थ्यांनी मधून काही विद्यार्थिनीची प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी निवड करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्येष्ठ शिक्षक श्री.जोगदंड सर यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवर व शिक्षक वृंद यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थिनींना मोलाचे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना मुख्याध्यापिका श्रीमती डोंगरे मॅडम यांनी सांगितले की, जर महात्मा ज्योतिराव फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले नसते तर आज मला व तुम्हाला शिक्षण मिळाले नसते . महिलांना शिक्षणाचे महत्त्व कळाले नसते. त्यांच्यामुळेच आज मुली महिलांना शिक्षणाची संधी मिळाली आहे. म्हणून विद्यार्थिनींनी महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेणे गरजेचे आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनींनी केले तर उपस्थितांचे आभार गुंड सर यांनी मानले.

यावेळी श्रीमती नेरकर मॅडम, श्रीमती मोटाडे मॅडम, श्रीमती लामतुरे मॅडम, श्री,जोगदंड सर, श्री.सुसंगे सर, श्री. गुंड सर यांच्यासह शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# घर बांधण्यासाठी १५ लाखाची मागणी;उपाशी ठेवून, विवाहितेसह बाळाला हाकालले घराबाहेर

केज/प्रतिनिधी -घर बांधण्यासाठी माहेरहून १५ लाख रुपये घेवून ये म्हणुन सासरच्या मंडळींनी उपाशी ठेवून, मारहाण करून बाळासह घरा बाहेर हाकलून दिल्या प्रकरणी सासू, सासऱ्यासह पती विरुद्ध केज पोलिसांत गून्हा नोंद झाला आहे.




केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील शितल हिचा विवाह ३ वर्षांपूर्वी धाराशिव जिल्ह्यातील वडजी येथील अजय रामेश्वर जाधवर यांच्या सोबत हिंदू रितिरिवाजा प्रमाणे झाला होता. लग्नानंतर एक वर्षे सासरच्यांनी शितलला चांगले सांभाळले. परंतु पती अजय जाधवरला ऑनलाईन गेम ची सवय लागल्यामुळे त्याच्यावर मोठ्या प्रमाणात खाजगी सावकारांचे कर्ज झाले. त्या कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी सासरच्यांनी सारखाच तगादा लावल्यामुळे दिड महिन्यापूर्वीच शितलच्या आई-वडिलांनी त्यांची जमीन विकून ३ लाख रुपये दिले होते. परंतु त्यानंतरही पती अजय जाधवर हा पत्नी शितलला कॉल करून खाजगी सावकारांना कॉल वर बोलण्यासाठी जबरदस्ती करीत होता, नाही बोललीस तर बाळासह तुला जीवे मारून टाकीन म्हणुन धमकी देत होता. १५ लाख रुपये घेवून घरी ये म्हणुन शीतलला उपाशी ठेवून, शिवीगाळ करून, लाथा, बुक्क्यानी मारहाण करून १६ नोव्हेंबर २०२५ रोजी घराबाहेर हाकलून दिले.

व शारीरिक व मानसिक छळ केला म्हणुन शितल अजय जाधवर रा.वडजी जि.धाराशिव ह.मू. दहिफळ वडमाऊली या विवाहितेच्या फिर्यादीवरून पती अजय रामेश्वर जाधवर, सासरा रामेश्वर अर्जुन जाधवर,व सासू

रमा रामेश्वर जाधवर या तिघां विरुद्ध केज पोलिसांत शारीरिक व मानसिक छळ करून मारहाण करून बाळासह घरा बाहेर हाकलून दिले म्हणुन गून्हा नोंद झाला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास हा पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला जमादार पल्लवी तरकसे या करीत आहेत.

# अनुभवी ज्येष्ठ नेतृत्व हरपले उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांना श्रद्धांजली

पुणे, : माजी केंद्रीय मंत्री, पुणे शहराच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणारे सुरेश कलमाडी यांच्या निधनाने पुणे शहराच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून अनुभवी ज्येष्ठ नेतृत्व हरपले आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोक भावना व्यक्त करत माजी खासदार सुरेश कलमाडी यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोक संदेशात म्हणतात की, भारतीय हवाई दलात पायलट म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करून सुरेश कलमाडी यांनी पुणे शहराच्या राजकीय, सामाजिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात ठसा उमटवला. पुण्याचे खासदार, केंद्रीय मंत्री तसेच भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी दीर्घकाळ योगदान दिले. त्यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या 'पुणे फेस्टिव्हल' आणि 'पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन' सारख्या उपक्रमांमुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पुण्याची वेगळी ओळख निर्माण झाली. पुणे शहराच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनात त्यांनी दिलेले योगदान कायम स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने एक अनुभवी नेतृत्व हरपले आहे,



अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# ऐश्वर्या संपन्न श्री.संत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त येवता येथील सोनवणे वस्ती येथे काल्याचे कीर्तन संपन्न

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील येवता येथील सोनवणे वस्ती येथे श्री.संत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त त्रिदिनी सप्हात्याचा समारोप हा ह.भ.प. लक्ष्मण महाराज इनामदार यांच्या काल्याच्या कीर्तनाने संपन्न झाला.



जगद्विख्यात तत्वज्ञानी,थोर प्रबोधनकार,युगप्रवर्तक राष्ट्र संत भगवानबाबा हे वारकरी संप्रदायाचे वैभव होते त्यांच्या पुण्यतिथी निमित्त सोनवणे वस्ती येथे त्रिदिनी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.पहिल्या दिवशीची कीर्तन सेवा ही ह.भ.प.अनिल महाराज कासकर यांचे अमृततुल्य कीर्तन झाले तर दुसऱ्या दिवशीची कीर्तन सेवा ही ह.भ.प.गणेश महाराज बांगर यांनी केली व काल्याचे किर्तन ह. भ. प. लक्ष्मण महाराज इनामदार यांच्या कीर्तनाने समारोप करण्यात आला.यावेळी केज तालुक्यातून माजी सभापती प.स.केज विष्णू भाऊ घुले, भाजपचे सुरज घुले ,सरपंच विलास अप्पा जोगदंड , मच्छिंद्र जोगदंड, रमेश जोगदंड पी.सी. जोगदंड,अशोक जाधवर ,दत्तात्रय सावंत कमलाकर ,सोनवणे,सुरज मिसाळ,व गावातील प्रतिष्ठान नागरिक काशीदवाडी,गपेवाडी व येवता येथील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती यावेळी महाराजांनी भगवान बाबा यांचे चरित्र सांगुन भगवानबाबांनी सर्व समाजाला सोबत घेऊन आपल्या किर्तनातुन संदेश दिला एक एकर विका पण मुलांना शिकवा आशा पद्धतीने समाज कार्य केले.

# 'पूर्व विदर्भातील पशुपालन संधी आणि कार्यक्रम' यावर विचारमंथन

नागपूर : शासनातर्फे सन २०२६ हे आंतराष्ट्रीय पशूपालक व गवताळ माळरान वर्ष राबविण्यात येत आहे. या औचित्याने महास्ट्राईड प्रकल्पाअंतर्गत पूर्व विदर्भातील पशूपालन संधी आणि कार्यक्रम याबाबत विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली आज विभागीय आयुक्त कार्यालय येथे विचारमंथन करण्यात आले.




पूर्व विदर्भातील पशुपालन संधी आणि कार्यक्रम यावर सादरीकरण करण्यात आले तसेच या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी महाराष्ट्र इन्स्टिटयूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (चखढठ) ने जागतिक बँकेच्या सहकार्याने जिल्ह्यांच्या सक्षम विकासासाठी संस्थात्मक क्षमता बळकट करण्याकरीता महास्ट्राईड (ारहरडढठखऊए) हा एक महत्वाकांशी प्रकल्प हाती घेतला आहे,याद्वारे संपूर्ण राज्यात सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी जिल्हास्तरावर संस्थात्मक क्षमता वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.

यावेळी उपायुक्त (नियोजन) अनिल गोतमारे, माफसूचे संचालक (संशोधन) डॉ. नितीन कुरकुरे, पशुसंवर्धन विभागाचे नागपूर विभागीय सह आयुक्त सतिश राजू, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. नितीन फुके, सेंटर फॉर पिपल्स कलेक्टिव्हचे सजल कुलकर्णी यांचासह संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.